**—: प्रेस नोट :—** दिनांक : ०१/०६/२०१९

यातील लोकसेवक यांनी फिर्यादीच्या अनुकंपा तत्वावर वारस नोकरी (पी.टी. केस) करीता रु. ४०,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी करुन पहिला हप्ता रु. १५,०००/— स्विकारण्याचे मान्य केले व आज रोजी रु. १५,०००/— रक्कमेची लाच स्विकारली म्हणून मुंबई लाचलुचपत प्रतिवंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | २०/२०१९ |
| कलम | कलम ७, भ्र. प्र. अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सुर्यकांत आनंदराव जाधव, वय ५० वर्षे, धंदा—नोकरी (लिपिक, नेमणुक घनकचरा व्यवस्थापन यांचे कार्यालय, एफ/साऊथ वॉर्ड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/— |
| स्विकारलेली रक्कम | रु. १५,०००/— (पहिला हप्ता) |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे वडील कै. अशोक भाऊ शिंदे हे चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून दि. ३१/१२/२०१८ रोजी सेवानिवृत झाले होते. ते दिनांक २०/०१/२०१९ रोजी मयत झाल्याने बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या नियमानुसार अनुकंपा तत्वावर वारस नोकरी (पी.टी. केस) करीता फिर्यादी यांनी अर्ज केला होता. यातील आलोसे यांनी फिर्यादी यांची पी.टी.केसची फाईल हेड ऑफिसला पाठविण्याकरीता फिर्यादी यांचेकडे रु. ४०,०००/— इतक्या लाचेची मागणी करुन त्यापैकी पहिला हप्ता रु. १५,०००/— ची मागणी केली.<br><br>फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिवंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयात दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ३१/०५/२०१९ रोजी पडताळणी करून आज रोजी सापळा रचण्यात आला. सापळा कारवाईमध्ये लोकसेवकास फिर्यादी यांचेकडून रु. १५,०००/— रोख रकमेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार अॅप्लीकेशन - www.acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्र. १०६४**
**दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,**
**व्हॉट्स अॅप क्रमांक —९९३०९९७७००**

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

1.6.19

( दिनकर पिंगळे )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबधंक विभाग,
मुंबई विभाग.

Scanned by CamScanner